## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६ ००४.

क्र.कोविमं/लेखा/निस्प/ 2515
दिनांक: २५/०१/२०२२

प्रति,

सर्व मुख्याध्यापक / प्राचार्य,
सातारा/सांगली/कोल्हापूर

**विषय :- सन २०२१-२२ या वर्षाकरिता राज्यातील माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांसाठी राज्यस्तरीय निबंध स्पर्धा आयोजित केल्याबाबत.**

संदर्भ :- क्र.रा.मं./ संशोधन/निबंधस्पर्धा २७४, दि.१७/०१/२०२२ चे पत्र.

उपरोक्त विषयाच्या संदर्भांकित पत्रास अनुसरून कळविण्यात येते की, सन-२०२१-२२ या वर्षाकरिता राज्यातील माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांसाठी राज्यस्तरीय निबंध स्पर्धा आयोजित केली आहे. महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांनी या स्पर्धेत मोठया संख्येने सहभाग घ्यावा यासाठी या विभागीय मंडळाकडून आवाहन करण्यात येत आहे. सदर निबंध मंडळाकडे हस्तपोच किंवा पोस्टाने सादर करण्याच्या दिनांकास मुदत वाढ देण्यात आलेली असून ती दिनांक १५ जानेवारी, २०२२ ऐवजी दिनांक १५ मार्च, २०२२ अखेरपर्यंत वाढविण्यात आलेली आहे. सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील मुख्याध्यापकांनी सर्व शिक्षकांच्या निदर्शनास आणून दयावे, तसेच त्यांना स्पर्धेत सहभागी होण्याकरिता प्रोत्साहित करावे.

निबंधाचे विषय

१. अध्यापनात तंत्रज्ञानाची उपयुक्तता
२. ऑनलाईन अध्यापनातील समस्या व उपाय
३. बदलत्या शैक्षणिक प्रवाहांसाठी प्रशिक्षणांची आवश्यकता
४. विद्यार्थ्यांवरील समाज माध्यमांचा परिणाम
५. विद्यार्थी विकासासाठी अवांतर वाचन

(सत्यवान सोनवणे)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

सोबत :-
निवेदनाची प्रत व निबंध स्पर्धेचा तपशिल

प्रत माहितस्तव सादर,
मा. सचिव,
राज्य मंडळ, पुणे

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-४**
**माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी राज्यस्तरीय निबंधस्पर्धा,**
**सन २०२१-२२**

# *निवेदन*

**संदर्भ- माहे डिसेंबर २०२१ च्या शिक्षण संक्रमण अंकातील निवेदन पहावे.**

सन २०२१-२२ या वर्षाकरिता राज्यातील माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांसाठी मंडळाने राज्यस्तरीय निबंध स्पर्धा आयोजित केली आहे. याबाबतचे निवेदन व माहिती पत्रक माहे डिसेंबर २०२१ च्या अंकात प्रसिध्द करण्यात आलेले आहे. राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांनी मुख्याध्यापक/प्राचार्यामार्फत आपले निबंध मा.सचिव महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, बालचित्रवाणी शेजारी, शिवाजीनगर, पुणे-४११००४ किंवा विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण विभागीय मंडळ या पत्त्यावर १५ जानेवारी, २०२२ पूर्वी पोहोचतील, अशा रितीने समक्ष सादर करावेत किंवा पोस्टाने पाठवावेत असे कळविलेले होते. परंतू सदर निबंध मंडळाकडे सादर करण्याची अंतिम तारीख **१५ मार्च ,२०२२** पर्यंत वाढविण्यात येत आहे. यानंतर प्राप्त झालेले निबंध विचारात घेतले जाणार नाहीत.

तरी राज्यस्तरीय निबंध स्पर्धेसंबंधीचे हे निवेदन राज्यातील सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील मुख्याध्यापकांनी सर्व शिक्षकांच्या निदर्शनास आणून द्यावे, तसेच त्यांना स्पर्धेत सहभागी होण्याकरिता प्रोत्साहित करावे, अशी विनंती आहे.

**(डॉ.अशोक भोसले)**
**सचिव**
**राज्यमंडळ, पुणे-०४**

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे

## माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी राज्यस्तरीय निबंध स्पर्धा,

---------------- सन २०२१-२२ ----------------

### * निबंध स्पर्धेचा तपशिल *

**अ) सर्व साधारण निकष-**

१. आशय संपन्नता

२. विचारातील अद्ययावतता, सामाजिक बांधिलकी

३. मांडणी, तर्कशुध्दता

४. भाषा शैली-परिणामकारकता

५. भाषाशुध्दता

**ब) निबंधाबाबत अपेक्षा-**

१. अध्यापकाचे अनुभव, समाज निरीक्षण, चिंतनशिलता, प्रत्यक्ष प्रयोग,उपक्रम यांचे प्रतिबिंब

२. संदर्भासाठी दिलेले ग्रंथ, त्यांचे लेखक, ग्रंथाची आवृत्ती, प्रकाशन, पृष्ठ क्रमांक, इ. बिनचुक माहिती

३. मुद्देसुदपणा, विधायकता व शैक्षणीक दृष्टिकोन असावा.

**क) स्पर्धकाची पात्रता-**

मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक/मुख्याध्यापक असावा.

**ड) स्पर्धेचे नियम-**

१. शब्द मर्यादा ३००० शब्द

२. माध्यम-मराठी, हिंदी,किंवा इंग्रजी यापैकी कोणतीही भाषा.

३. निबंध तीन प्रतीत सादर करणे आवश्यक राहील.

४. निबंध सुवाच्च व सुस्पष्ट असावा.

५. चित्रे, आकृत्या असल्यास त्या सुस्पष्ट व सुरेखित असाव्यात.

६. स्पर्धकाने आपले नांव निंबधपत्राच्या कोणत्याही पृष्ठावर लिहू नये.

७. नियुक्त केलेल्या परीक्षक समितीने दिलेला निर्णय स्पर्धकाना बंधनकारक राहील.

८. पारितोषिक मिळालेले निबंध मंडळाच्या शिक्षण संक्रमण मासिकात यथावकाश प्रसिध्द करण्याबाबतचे अधिकार मंडळास राहतील.

९. स्पर्धेचा निकाल जाहीर करण्याची तारीख निबंध प्राप्त झाल्यापासून साधारण तीन ते चार महिन्यांचा कालावधी नंतरची राहील.